देशोन्नती दि. 04/06/2022

# घरातून निघून गेलेल्या तीन भावंडांना भोकर पोलिसांनी शोधून काढले

देशोन्नती वृत्तसंकलन...

**भोकर** ■ आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या व घरातून निघून गेलेल्या भोकर तालुक्यातील धावरी (खु) येथील तीन मुलांचा शोध भोकर पोलिसांनी घेतला आहे.

भोकर तालुक्यातील धावरी (खु) येथील प्रभू गणेश चव्हाण (१०), आदर्श गणेश चव्हाण(९), करण गणेश चव्हाण( ८) हि तिन्ही बालके त्यांच्या आजोबासोबत राहत होते. वडिलांचे छत्र हरवलेले आहे, तर आई त्यांना सोडून देवून निघून गेली आहे. आठवडाभरापूर्वी हि तीनही बालके घरातून निघून गेली होती. याबाबत आजोबांनी भोकर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. त्यानुसार जून महिण्यात पोलिसांचे ऑपरेशन

## ऑपरेशन मुस्कान अंतर्गत काम



मुस्कान हे अभियान हरवलेल्या बालकांसाठी चालू आहे. भोकर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांनी सदर बालकांचा शोध घेण्यासाठी पोहेकॉ. देवकांबळे व जाधव यांना आदेशित केले होते. त्यानुसार तिन्ही बालके नांदेड येथे सापडल्याने ३ जून रोजी त्यांना भोकर पोलिस ठाण्यात आणण्यात आले व सदर तिन्ही बालकांना आजोबाच्या स्वाधीन करण्यात आले. (ता.प्र.)

### हरवलेल्या बालकांसाठी ऑपरेशन मुस्कान

समाजातील हरवलेल्या बालकांसाठी पोलिसांच्यावतीने जून महिण्यात ऑपरेशन मुस्कान ही मोहीम राबविण्यात येत असून या अभियानाअंतर्गत समाजातील कोणतीही व्यक्ती हरवलेल्या बालकांसाठी काम करू शकते. आपण कुठे रेल्वे, बसने जात असतांना हरवलेली बालके आढळून आले तर त्यांना विचारपूस करून त्यांच्या घरी पाठवू शकता. या अभियानात सेवाभावी कार्य करणाऱ्या नागरिकांनी काम करून हरवलेल्या बालकांना आधार द्यावा, असे आवाहन भोकर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांनी केले आहे.

दै. लोकमत दि. 04/06/2022

# आई नसलेल्या तिघा भावांनीही सोडले घर

## ऑपरेशन मुस्कान अंतर्गत चारही भावंडे सुखरूप पोहोचली आजोबाकडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**भोकर :** जन्मदाती आई चिमुकल्या तीन मुलांना सोडून निघून गेली. त्यानंतर वयोवृद्ध आजोबा या बालकांचा सांभाळ करीत होते; परंतु एके दिवशी अचानक तिन्ही भावंडं घर सोडून निघून गेली. त्यामुळे घाबरलेल्या आजोबांनी तातडीने भोकर पोलिसात धाव घेतली. पोलिसांनीही तातडीने तपासाची चक्रे फिरवून तिन्ही भावडांना सुखरुप त्यांच्या आजोबांच्या ताब्यात दिले. ही तिन्ही भावंडं नांदेड शहरात फिरत होती.

भोकर तालुक्यातील धावरी खु. येथील करण (८ वर्ष), आदर्श (९ वर्ष) आणि दहा वर्षांचा प्रभू गणेश धावरे ही तिन्ही भावंड आई सोडून निघून गेल्यामुळे आजोबाकडे राहत होते. वयोवृद्ध आजोबा त्यांचा सांभाळ करीत होते; परंतु एके दिवशी अचानक ही बालके घरातून निघून गेली. त्यानंतर आजोबांनी भोकर पोलिसांनी याबाबत माहिती दिली. भोकरचे पोनि. विकास पाटील यांनी पोलीस अंमलदार देवकांबळे आणि जाधव यांना या बालकांच्या शोधाची जबाबदारी दिली. ही तिन्ही भावंड नांदेड शहरातच फिरताना आढळून आली. त्यानंतर भोकर पोलीस ठाण्यात त्यांना आणण्यात आले. या तिन्ही भावंडांना त्यांच्या आजोबाच्या ताब्यात देण्यात आले.

### ऑपरेशन मुस्कानमध्ये घ्या सहभाग

■ पोलिसांकडून ऑपरेशन मुस्कान-११ सुरु करण्यात आले आहे. या मोहिमेंतर्गत बेपत्ता झालेल्या लहान बालकांचा शोध घेण्यात येतो. त्यामुळे नागरिकांनी फिरताना, प्रवास करताना, रेल्वे, बसमध्ये, हॉटेलवर अशा प्रकारची बालके आढळल्यास त्याबाबत पोलिसांना माहिती द्यावी. जेणेकरुन ही चिमुकले त्यांच्या कुटुंबीयांकडे सुखरुप पोहोचतील, असे आवाहन करण्यात आले आहे.